दि. ०८/११/२०२२.

⑦ महाराष्ट्र टाईम्स पान नं.०१

# आर्थिक आरक्षण वैध

## घटनात्मक वैधतेवर सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब; विभाजित निकाल

म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली

'आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गाला शैक्षणिक प्रवेशात तसेच सरकारी नोकऱ्यांमध्ये १० टक्के आरक्षण देण्याच्या केंद्रातील मोदी सरकारच्या निर्णयावर सोमवारी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने ३-२ अशा बहुमताच्या निकालाने शिक्कामोर्तब केले. मात्र, या आरक्षणातून अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसींना वगळण्याचा निर्णय घटनाबाह्य असल्याचे नमूद करीत पाच न्यायमूर्तींच्या पीठापैकी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश उदय लळित आणि त्यांचे सहकारी न्या. रवींद्र भट यांनी या निकालाच्या विरोधात मतदान केले.

अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींना वगळून आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गाला आरक्षण देणे राज्यघटनेतील मूळ उद्दिष्टांच्या विरोधात असल्याचा दावा करीत या आरक्षणाला फेब्रुवारी, २०२०मध्ये मध्य प्रदेश उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयात पोहोचलेले हे प्रकरण माजी सरन्यायाधीश शरद बोबडे यांच्या अध्यक्षतेखालील पीठाने पाच सदस्यीय घटनापीठाकडे सोपविले होते. सरन्यायाधीश उदय लळित यांच्या अध्यक्षतेखालील घटनापीठाने सहा दिवसांच्या सुनावणीनंतर २७ सप्टेंबर रोजी याचा निकाल राखून ठेवला होता. निवृत्तीच्या एक दिवस आधी सोमवारी सरन्यायाधीशांनी या दूरगामी खटल्याचा निकाल दिला. सरन्यायाधीश लळित यांच्या अध्यक्षतेखालील घटनापीठातील न्या. दिनेश माहेश्वरी, न्या. बेला त्रिवेदी आणि न्या. जे. बी.पारडीवाला यांनी आर्थिक दुर्बल वर्गाला १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय वैध ठरविला. 'या आरक्षणामुळे राज्यघटनेचे मूळ स्वरूप आणि समानतेच्या अधिकारांचे उल्लंघन होत नाही. आरक्षणाच्या निश्चित करण्यात आलेल्या ५० टक्क्यांच्या मर्यादेच्या आधारावरही आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गासाठीच्या आरक्षणाचे उल्लंघन होत नाही', असा तर्क न्या. दिनेश माहेश्वरी यांनी आपल्या निकालात मांडला आहे. 'आरक्षणाकडे कमकुवत वर्गाला मदत पोहोचविण्याच्या दृष्टिकोनातून बघण्यात यावे', असे न्या. बेला त्रिवेदी यांनी म्हटले आहे. न्या. पारडीवाला यांनी न्या. माहेश्वरी आणि न्या. त्रिवेदी यांच्या मताशी सहमती दर्शविताना हे आरक्षण अमर्याद काळासाठी लागू होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

आर्थिक आरक्षण देण्यासाठी मोदी सरकारने १०३वी घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत ८ जानेवारी, २०१९ रोजी तर, राज्यसभेत १० जानेवारी, २०१९ रोजी संमत केले होते. लोकसभेत या विधेयकाच्या बाजूने ३२३ तर विरोधात ३ मते पडली होती. राज्यसभेतही या विधेयकावर १६५ विरुद्ध ७ मतांनी शिक्कामोर्तब करण्यात आले.



### सरन्यायाधीशांचेच विरोधी मत

न्या. रवींद्र भट यांनी आर्थिक दुर्बल वर्गाला आरक्षण लागू करताना त्यातून अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींना बाहेर ठेवण्याचा निर्णय घटनाबाह्य असल्याची टीका करीत या आरक्षणाचा विरोध केला आहे. हे आरक्षण भेदभाव करणारे आणि समानतेच्या भावनेला संपविणारे असल्याचे सांगून ते चुकीचे असल्याचे मत न्या. भट यांनी आपल्या निकालात व्यक्त केले आहे. सरन्यायाधीश उदय लळित यांनी आपण न्या. भट यांच्या विचारांशी पूर्णपणे सहमत असल्याचे निकालपत्रात म्हटले आहे.

### आर्थिक दुर्बल आरक्षणाचे लाभार्थी कोण?

- खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिक.
- संबंधित व्यक्तीचे वा त्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक.
- शेती, उद्योग, इतर व्यवसायांतील उत्पन्न हे वार्षिक उत्पन्नात गृहीत धरले जाणार.

### लाभार्थी होण्यासाठीच्या अटी कुठल्या?

- संबंधिताकडे ५ एकरपेक्षा अधिक कृषीजमीन असता कामा नये.
- संबंधिताचे घर २०० चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळाचे असता कामा नये.
- घर २०० चौरस मीटरपेक्षा अधिक असल्यास ते पालिकाक्षेत्रात असता कामा नये.

### 'ईडब्ल्यूएस'साठीचे पुरावे कुठले?

- उत्पन्न व मालमत्ता प्रमाणपत्र
- हे प्रमाणपत्र तहसीलदार वा त्यावरील दर्जाच्या गॅझेटेड अधिकाऱ्याकडून मिळालेले असावे.
- या प्रमाणपत्राचे दरवर्षी नूतनीकरण करावे लागेल

महाराष्ट्र टाईम्स पान नं.०१ दि.०८/११/२२

# अब्दुल सत्तार पुन्हा बरळले

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद/मुंबई

## सुप्रिया सुळे यांच्याबद्दल अनुद्गार; संतापानंतर माफी




गेल्या काही दिवसांपासून आक्षेपार्ह विधाने करणारे कृषिमंत्री अब्दुल सत्तार सोमवारी पुन्हा बरळले. खासदार सुप्रिया सुळे यांच्याविषयी वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांचा तोल गेला व त्यांनी सुळे यांच्याविषयी अनुद्गार काढले. यानंतर संताप उफाळला व सत्तार यांच्यावर टीकेचा भडीमार झाला. राष्ट्रवादी काँग्रेसने आक्रमक होत मुंबई, औरंगाबाद, पुणे, नाशिकसह ठिकठिकाणी आंदोलन केले. मुंबईतील सत्तार यांच्या शासकीय बंगल्यासमोर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. संतप्त आंदोलकांनी सत्तार यांच्या मुंबईतील शासकीय बंगल्याच्या खिडकीची तावदाने फोडल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड येथे सोमवारी खासदार श्रीकांत शिंदे यांची सभा झाली. हा (पान ५वर)

### मुख्यमंत्र्यांकडून समज

सत्तार यांनी विनाकारण ओढवून घेतल्याने नाराज झालेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सत्तार यांना फोन करून समज दिल्याचे समजते. मुख्यमंत्र्यांनी सत्तार यांना सुळे यांची माफी मागण्याचा सल्ला दिल्याचे समजते. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी हा मुद्दा तापवण्याचे राजकारण सुरू ठेवल्यास त्याला कशाप्रकारे प्रत्युत्तर द्यायचे तसेच हा वाद शांत करण्यासाठी काय करायला हवे याचे मार्गदर्शन करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी ही बैठक बोलावल्याचे समजते.

पान नं.०५

# अब्दुल सत्तार पुन्हा बरळले

(पान एकवरून) मतदारसंघ कृषिमंत्री सत्तार यांचा आहे. शिंदे-फडणवीस सरकार स्थापनेनंतर पन्नास खोक्यांचा विषय चांगलाच रंगला आहे. त्या पार्श्वभूमीवर सत्तार यांना सुळे यांच्या आरोपांबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर सत्तार यांनी सुळे यांच्याबद्दल आक्षेपार्ह शब्दप्रयोग केला. याची व्हिडीओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर राज्यभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. यानंतर सत्तार यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना भूमिका मांडली. ते म्हणाले, 'माझा कुठल्याही माता-भगिनीचा अपमान करायचा हेतू नव्हता. माझ्या वक्तव्यामुळे जर कुणाची मने दुखावली असतील, तर दिलगिरी व्यक्त करतो.' मात्र त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी मैदानात उतरली.

'सत्तार यांचे वक्तव्य निषेधार्ह असून, महिला लोकप्रतिनिधींविषयी गलिच्छ भाषेत वक्तव्य करून अब्दुल सत्तार यांनी त्यांच्या मागास प्रवृत्तीचे दर्शन घडविले आहे. अनेकदा वादग्रस्त वक्तव्ये करणाऱ्या सत्तार यांचा तातडीने मंत्रीपदाचा राजीनामा घ्यावा', अशी आग्रही मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली आहे. या वक्तव्याच्या विरोधात राज्यातील राष्ट्रवादी काँग्रेस कमालीची आक्रमक झाली आहे. राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी अब्दुल सत्तार यांचा पुतळा दहन करणे, सत्तार यांच्या प्रतिमेला जोडे मारण्याचे आंदोलन सुरू केले आहे. मंत्रालय परिसरातील सत्तार यांच्या शासकीय बंगल्यासमोर आंदोलन करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष विद्या चव्हाण यांच्यासह राष्ट्रवादीच्या काही कार्यकर्त्यांची पोलिसांनी धरपकड केली व त्यांना बॅलार्ड पिअर पोलिस ठाण्यात नेले. तेथे आंदोलकांची वैयक्तिक हमीवर सुटका झाली.

कृषिमंत्री अब्दुल सत्तार, पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील आणि सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण या महिलांविषयी वादग्रस्त विधान करणाऱ्यांना अथवा महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना शिंदे-फडणवीस सरकार पाठीशी घालत असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी महिला आघाडीतर्फे विद्या चव्हाण यांनी केला. 'मुख्यमंत्र्यांनी या तीनही मंत्र्यांचे राजीनामे घ्यावेत. अन्यथा महिला आघाडीचे मंत्रालय आणि वर्षा बंगल्यासमोर आंदोलन होतच राहील', असा इशाराही चव्हाण यांनी दिला. सत्तार यांची २४ तासांत मंत्रिपदावरून तातडीने हकालपट्टी करण्यात यावी. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा पक्षातर्फे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी दिला आहे. तसेच सत्तार यांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांनी माता रमाबाई आंबेडकर पोलिस ठाण्याला निवेदन देऊन केली आहे.

सत्तारांनी गेल्या काही दिवसांत आक्षेपार्ह विधाने केली आहेत. आदित्य ठाकरे यांचा 'छोटा पप्पू' असा उल्लेख सत्तारांनी केला होता. तसेच बीड जिल्हाधिकाऱ्यांना सत्तारांनी 'चहा पित नाही तर दारू पिता काय, असा प्रश्न विचारला होता. सातत्याने आक्षेपार्ह विधाने करणाऱ्या सत्तारांनी यावेळी खासदार सुप्रिया सुळे यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याचे मात्र राज्यभर तीव्र पडसाद उमटले आहेत.

### महिला आयोगाकडून दखल

महिला आयोगाने पोलिस महासंचालकांना पत्र लिहून सत्तार यांच्या विधानाप्रकरणी कायदेशीर कारवाई करून त्याचा अहवाल सादर करावा, असे सांगितले आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी सोमवारी ट्वीट करून पोलिस महासंचालकांना पाठविलेले पत्र प्रसिद्ध केले. महिलांना अपमानास्पद वागणूक देत, आक्षेपार्ह विधाने करत त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवत कर्तृत्वहनन करणाऱ्या अशा वक्तव्याची आयोगाने दखल घेतली आहे, असे चाकणकर यांनी म्हटले आहे.



### मुख्यमंत्र्यांच्या पक्षातर्फे दिलगिरी

सत्तार यांच्या विधानाबाबत बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाचे प्रवक्ते आणि शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी प्रतिक्रिया दिली. 'शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्याबद्दल कोणीही वाईट अथवा व्यक्तिगत बोलू नये. पक्षाकडून मी सुप्रिया सुळे यांच्याप्रति दिलगिरी व्यक्त करतो. मुख्यमंत्री हे सत्तार यांना समज देतील. कोणत्याही महिलेचा अपमान होऊ नये, अशी आमची भूमिका आहे', असेही केसरकर म्हणाले.

दि. ०८/११/२०२२.

(३) महाराष्ट्र टाईम्स पान नं.०१

## पोलिस उपायुक्तांच्या बदल्यांना मुहूर्त

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांच्यामध्ये एकमत होत नसल्याने अनेक महिन्यांपासून रखडलेल्या पोलिसांच्या बदल्यांना अखेर मुहूर्त सापडला आहे. पोलिस उपायुक्त, अधीक्षक दर्जाच्या १०९ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश सोमवारी गृह विभागाने जारी केले. बदली झालेल्या अधिकाऱ्यांपैकी १४ उपायुक्तांची नियुक्ती मुंबईत करण्यात आली आहे. मात्र अतिवरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या रखडलेल्याच आहेत.

पोलिसांच्या बदल्या दरवर्षी ३१ मेपर्यंत कराव्यात, असे निर्देश आहेत. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना ३० जूनपर्यंत सर्व प्रकारच्या बदल्यांना स्थगिती देण्यात आली. त्यानंतर राज्यात सत्तांतर झाले आणि शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आले. बदल्या आणि बढत्यांमध्ये चालढकल होत असल्याने पोलिस दलामध्ये प्रचंड नाराजी होती. 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये याबाबत वृत्ते प्रसिद्ध झाली होती. आता हे आदेश जारी केले. अभिनव देशमुख, अनिल पारसकर, एम. रामकुमार, मनोज पाटील, अमोघ गावकर, गौरव सिंग, तेजस्वी सातपुते, प्रवीण मुंढे, दीक्षितकुमार गेडाम, मंगेश शिंदे, अजय कुमार बन्सल, मोहित गर्ग, पुरुषोत्तम कराड, अकबर पठाण या १४ उपायुक्तांना मुंबईत नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) म. टा. पान नं. ०१.

## राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून प्रेक्षकाला मारहाण

ठाणे : येथील विवियाना मॉलमध्ये सुरू असलेल्या 'हर हर महादेव' चित्रपटाला विरोध दर्शवीत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी कार्यकर्त्यांसह चित्रपटगृहात शिरून चित्रपट बंद पाडण्याचा प्रयत्न केला.

चित्रपटात चुकीचा इतिहास दाखवला असल्याचा दावा करून प्रेक्षकांना चित्रपट न पाहण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यावेळी एका प्रेक्षकाने त्यास विरोध दर्शवत चित्रपटाच्या तिकीटांचे पैसे मागितले असता राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी या प्रेक्षकाला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यामुळे प्रेक्षकांत संताप उसळला होता. या प्रकारानंतर काही वेळात पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

दि. ०८/११/२०२२.

(५) म. २१. पु. पान नं. ०१.

# साखळीचोरांना वेसण

वैष्णवी राऊत, वसई

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील सोनसाखळीचोरीच्या गुन्ह्यांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ७० टक्क्यांनी घट झाली आहे. मागील.वर्षात जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यांच्या कालावधीत आयुक्तालयाच्या हद्दीत साखळीचोरीचे ८६ गुन्हे घडले होते. यंदा याच कालावधीत केवळ २६ गुन्हे घडल्याची माहिती पोलीस आयुक्तालयाने दिली आहे. या गुन्ह्यांमध्ये ७० टक्क्यांनी घट झाल्याने वसई-विरार, मिरा-भाईंदरवासियांना दिलासा मिळाला आहे.

वसई-विरार तसेच मिरा-भाईंदरमध्ये पोलिस आयुक्तालय स्थापन होण्याआधी साखळीचोरीचे गुन्हे मोठ्या प्रमाणावर घडत होते. दुचाकीवरून येऊन साखळी खेचून पोबारा करणे, वृद्ध महिलांना लक्ष्य करून साखळी, मंगळसूत्र चोरणे अशा घटना घडत होत्या. मात्र दोन वर्षापूर्वी पोलिस आयुक्तालयाची स्थापन झाल्यानंतर, या गुन्ह्यांमध्ये काहीशी घट झाल्याचे मागील वर्षाच्या आकडेवारीवरून दिसून आले होते. यंदा मात्र साखळीचोरीच्या गुन्ह्यांच्या संख्येत खूप मोठी घट झाली आहे. २०२१मध्ये जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यांत सोनसाखळीचोरीचे ८६ गुन्हे नोंदवण्यात आले होते. तेच २०२२मधील जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यांत २६ गुन्हे घडल्याची माहिती पोलिस आयुक्तालयाने दिली.

## आयुक्तालयाच्या हद्दीत गुन्हे ७० टक्क्यांनी घटले

- पोलिसांच्या उपाययोजनांना यश
- वसई -विरारवासियांना, मिरा-भाईंदर, दिलासा

### २०२२मधील सोनसाखळीचोरीच्या गुन्ह्यांची आकडेवारी

| पोलिस ठाणे | गुन्ह्यांची संख्या |
|---|---|
| विरार | ६ |
| आचोळे | ५ |
| नवघर | ४ |
| अर्नाळा | ३ |
| पेल्हार | २ |
| काशिमीरा | १ |
| भाईंदर | १ |
| माणिकपूर | १ |
| तुळींज | १ |
| वालिव | १ |
| नालासोपारा | १ |
| एकूण | २६ |

### उकल करण्यात यश

- सोनसाखळीचोरीच्या गुन्ह्यांची उकल करण्यातही पोलिस आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या पोलिसांच्या विविध पथकांना यश आले आहे.

२०२१ मधील ८६ पैकी ६६ गुन्ह्यांची उकल
२०२२ मधील २६ पैकी १५ गुन्ह्यांची उकल

### गस्त ठरतेय यशस्वी

- पोलिस आयुक्तालयाच्या अंतर्गत मागील दोन वर्षांत नव्याने पोलिस ठाण्यांची निर्मिती करण्यात आली आहे.
- मनुष्यबळ वाढल्याने आयुक्तालयाच्या हद्दीतील गस्त वाढवणे शक्य झाले आहे.
- गस्तीसाठी जिल्हा प्रशासनातर्फे वाहनांची सोय, विविध कक्षांची स्थापना यामुळे गस्तीला बळकटी मिळाली.
- गस्तीद्वारे सोनसाखळीचोरांवर नजर ठेवण्यास मदत होत असल्याचा विश्वास पोलिस आयुक्तालयाने व्यक्त केला.
- यापुढेही अशाच प्रकारे गुन्हे नियंत्रण करण्यासाठी पोलिसांनी अधिकाधिक उपाययोजना करत राहावे, अशी अपेक्षा वसई-विरारमधील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

दि. ०८/११/२२.

(५) म.२१.५.धा१ नं.०१

# कारशेड आरक्षणावर हरकतींचा पाऊस

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदर दहिसर मेट्रो ९ व ७ (अ) प्रकल्पांसाठी भाईंदरच्या राई गावातील जमीन कारशेडसाठी आरक्षित करण्याविरोधात ग्रामस्थांनी तब्बल अकराशेहून अधिक हरकती व सूचना कोकण विभागाकडे नोंदवल्या आहेत. ग्रामस्थांचा विरोध असतानाही शहराच्या विकास आराखड्यात कारशेडसाठी जमीन आरक्षित करण्याचे आदेश नगरविकास विभागाने ऑक्टोबरमध्ये जारी केले होते. त्यावर महिन्याभरात या हरकती ग्रामस्थांनी नोंदवल्या आहेत.

महापालिका हद्दीत भाईंदर पश्चिमेला राई गावातील तब्बल ३२ हेक्टर जमिनीवर कारशेड उभारण्याचा एमएमआरडीएचा विचार आहे. मात्र शेतजमिनी व घरे बाधित होणार असल्याने ग्रामस्थांचा कारशेडला तीव्र विरोध आहे. ग्रामस्थांनी व्यक्तिशः एक हजार १६१ तर सामाजिक संघटनांकडून सहा अशा एकूण एक हजार १६७ हरकती व सूचना दाखल झाल्या.

### प्रक्रिया सुरू

मिरा-भाईंदरच्या प्रारूप विकास आराखड्यावरील हरकती व सूचना भाईंदर पश्चिमेच्या पालिका मुख्यालयातच स्वीकारण्याची सुविधा सोमवारपासून सुरू करण्यात आली आहे.

(७) म.२१.५.धा१ नं.०१.

# बहिणीच्या घरी घरफोडी

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरमध्ये एका घरफोडीच्या प्रकरणाचा तपास करताना, एका महिलेच्या घरी भावानेच घरफोडी केल्याचे समोर आले आहे. गुजरातला पळ काढलेल्या आरोपीला मिरा-भाईंदर वसई विरार पोलिसांच्या गुन्हे शाखेने नुकतीच अटक करून मुद्देमाल जप्त केला आहे.

मिरा रोडच्या १५ नंबर बसस्टॉप येथील एका इमारतीत राहणाऱ्या तरन्नुम खान या महिलेच्या घराचे कुलूप तोडून तिजोरीतील रोकड, सोन्याचे दागिने असा एकूण २६ लाख ६० हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेला होता. त्याची तक्रार तरन्नुम हिने ४ नोव्हेंबर रोजी मिरा रोड पोलिस ठाण्यात केली होती. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला होता. पोलिसांना मालाड, तरन्नुमचा मालवणी येथील राहणारा भाऊ फारमान खान याचा संशय आल्याने, त्याच्या घरी जाऊन माहिती घेतली असता, तो कुटुंबियांसोबत पसार झाल्याचे समोर आले. पोलिसांनी तीन पथके तयार करून ती वेगवेगळ्या ठिकाणी शोध घेतला असता, तो गुजरातच्या वलसाडमध्ये असल्याचे समजले. त्यानुसार पोलिसांनी फारमान याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने गुन्हा केल्याचे कबूल केले. त्याच्याकडून चोरीची २५ लाखांची रोकड व गुन्ह्यात वापरलेले सहा मोबाइल फोन जप्त करण्यात आल्याची माहिती गुन्हे शाखेचे उपायुक्त विजयकांत सागर यांनी दिली.

दि. ०८/११/२२.

① लोकसत्ता पान २/०५

# विरारमध्ये उघड्या गटारात पडून महिलेचा मृत्यू

लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी

**वसई :** विरार येथे उघड्या गटारात पडून एका महिलेचा मृत्यू झाला. कमलाबेन मेहता (६८) असे या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी विरार पोलिसांनी अपपमृत्यूची नोंद केली आहे.

विरार पश्चिमेच्या एमबी इस्टेट मध्ये राहणाऱ्या कमलाबेन शहा या दररोज सकाळी विरारच्या जैन मंदिरात जायच्या. सोमवारी जैन मंदिरात होणाऱ्या एका धार्मिक प्रवचनासाठी त्यांनी पहाटे साडेपाच वाजता घर सोडले होते. सकाळचे आठ वाजले तरी त्या घरी न परतल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी शोध सुरू केला होता. मात्र त्यांचा कुठेही पत्ता लागला नाही. त्या बेपत्ता होऊन २४ तास न उलटल्याने पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली नव्हती. त्यामुळे कुटुंबीयांनी समाजमाध्यमाद्वारे त्यांना शोधण्यासाठी आवाहन केले होते.

दरम्यान, संध्याकाळी पाच वाजता विरारच्याच एमबी इस्टेट परिसरात असलेल्या एका गटारामध्ये एका महिलेचा मृतदेह आढळून आला. विरार पोलिसांनी अग्निशमन दलाच्या सहाय्याने हा मृतदेह बाहेर काढला. हा मृतदेह बेपत्ता असलेल्या कमलाबेन मेहता यांचा असल्याचे नंतर उघड झाले. मेहता यांना स्मृतिभ्रंश तसेच मणक्याचा आजार होता. मात्र त्यांचा मृत्यू नेमका कशाने झाला त्याचा तपास सुरू आहे, अशी माहिती विरार पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश वराडे यांनी दिली.

② लोकसत्ता मु. पान २/०९

# महापालिकेच्या 'मॅरेथॉन'साठी स्पर्धकांच्या नोंदणीला वेग

## आतापर्यंत साडेतीन हजार स्पर्धकांची नोंदणी

लोकसत्ता वार्ताहर

**वसई:** वसई विरार महापालिकेतर्फे ११ डिसेंबरला रोजी होणाऱ्या मॅरेथॉन स्पर्धेसाठी पालिकेची तयारी सुरू झाली आहे. याशिवाय सहभागी स्पर्धकांच्या नावनोंदणीला वेग आला आहे. आतापर्यंत मॅरेथॉन स्पर्धेसाठी साडेतीन हजारांहून अधिक स्पर्धकांची नोंदणी करण्यात आली आहे.

स्पर्धेत विविध ठिकाणच्या राष्ट्रीय व राज्यस्तरीय पातळीवरील धावपटू यात सहभागी होतात. या मॅरेथॉनमध्ये ४२.१९७ किलोमीटर पूर्ण मॅरेथॉन, २१.०९७ किलोमीटर अर्धमॅरेथॉन, ११ किलोमीटर रन, ५ किलोमीटर टाइम रन, ४ किलोमीटर धमालधाव अशा विविध प्रकारच्या गटासाठी पालिकेच्या क्रीडा विभागाकडून स्पर्धकांची ऑनलाइन व ऑफलाइन नोंदणी सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत पालिकेच्या क्रीडा विभागाकडे साडेतीन हजार स्पर्धकांची नावे नोंदविण्यात आल्याची माहिती पालिकेकडून देण्यात आली आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना एकूण ५४ लाख रुपये रकमेची पारितोषिके दिली जाणार आहेत. याआधी महापौर मॅरेथॉन या नावाने स्पर्धा होत होती, मात्र करोनाच्या संकटकाळात पालिकेची निवडणूक ही होऊ न शकल्याने सध्या पालिकेचा कारभार हा प्रशासकाच्या हाती आहे. त्यामुळे महापौरपदी कोणीच नाही, त्यामुळे तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे. त्यासाठी यंदाच्या वर्षी वसई विरार महानगरपालिका मॅरेथॉन अशी स्पर्धा होणार आहे.

दि. ०८/११/२२

(१०) लोकसत्ता पृ. ५/११/२२

# बेकायदा गॅस कंपनीवर गुन्हे शाखेची कारवाई

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** वसईत चालणाऱ्या एका बेकायदा गॅस कंपनीवर मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या मध्यवर्ती शाखेने छापेमारी करत दीड लाखाचा माल जप्त केला आहे. या संदर्भात वालीव पोलीस ठाण्यात मालकाच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसईच्या कामण परिसरात एका कारखान्यात अवैधरीत्या व्यावसाईक गॅस सिलेंडरमधून छोट्या बाटल्यात भरणा करत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती शाखेला मिळाली होती. माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचत शनिवारी युनिक ऐसेस गॅस कंपनीवर कारवाई केली. कंपनीचा मालक सलीम खानरा याला कंपनीच्या कामाबद्दलच्या परवानग्या विचारल्या असता, तो कोणतीही कागदपत्रे सादर करू शकला नाही. त्याचबरोबर त्याच्याकडे अग्निसुरक्षा यंत्रणासुद्धा नसल्याने पोलिसांनी त्याला अटक केली. त्याच्याकडून पोलिसांनी १ लाख ८९ हजाराचा माल जप्त केला आहे. पोलिसांनी माहिती दिली की, छोट्या सिलेंडरमध्ये गॅस भरून तो सोनारांना विकत होता. काही दिवसांपूर्वी याच परिसरात एका कंपनीला अशाच प्रकारे कोणत्याही सुरक्षा नसल्याने आग लागून तीन कामगारांचा मृत्यू झाला होता.

(११) लोकसत्ता पृ. ५/११/२२

# जाधव मार्केट आगप्रकरणी तिघांवर गुन्हा

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**विरार :** नालासोपारा पूर्वेकडील रेल्वे स्थानकालगत असलेल्या अनधिकृत जाधव मार्केटला लागलेल्या आगीप्रकरणी तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मागील आठवड्यात या मार्केटला आग लागली होती.

नालासोपारा पूर्वेला रेल्वे स्थानकालगत भूमाफियांनी जाधव नावाचे बेकायदेशीर मार्केट वसवले आहे. या मार्केटमध्ये मोबाइल, विक्रीपासून इतर अनेक दुकाने मोठ्या दाटीवाटीने वसविण्यात आली आहेत. दिवाळीच्या दिवसात यात फटाक्यांची बेकायदेशीर दुकाने लावली होती, फटाक्याच्या दुकानात आग लागल्याने आजूबाजूची ७ ते ८ दुकाने जळून खाक झाली होती. या अगोदरही या मार्केटमध्ये आगी लागल्याच्या घटना समोर आल्या आहेत. यामुळे येथील रहिवासी भयभीत झाले आहेत. मागील आठवड्यातील आगीनंतर काही दिवसांनंतर येथील गाळे दुरुस्त करून हे अनधिकृत मार्केट पुन्हा सुरू करण्यात आले. या मार्केटला लागूनच शाळा असल्यामुळे रहिवाशांसह विद्यार्थ्यांनाही धोका निर्माण झाला होता. यामुळे आचोळे पोलिसांनी दुकानदार अनुज तिवारी, वसीम शेख आणि रिजवान शेख यांच्यावर गुन्हा दाखल केला असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकात सरोदे यांनी दिली.

दि- ०८/११/२२

(१२) लोकसत्ता पृ-५

# पोलीस कर्मचाऱ्यास मारहाण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** नालासोपारा पेल्हार पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या साहाय्यक पोलीस फौजदारास गुंडांनी मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. फौजदारांवर विरारच्या संजीवनी रुग्णालयात उपचार सुरू असून पोलिसांनी तीन जणांना अटक केली आहे.

पेल्हार पोलीस ठाण्यात साहाय्यक फौजदार म्हणून कार्यरत असलेले संजीव पंडित सोनवणे (५३) हे शनिवारी दाखल असलेल्या अदखलपात्र गुन्ह्यातील विरोधकांना समज देण्यासाठी जीवदानी चाळ बिलालपाडा परिसरात गेले असताना सात ते आठ महिला, पुरुषांनी जमाव करून त्यांना दमदाटी आणि शिवीगाळ करून लाकडी दांडक्याने मारहाण केली. यात सोनवणे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तर पेल्हार पोलिसांनी सदर प्रकरणी सात ते आठ जणांवर गुन्हा दाखल करत तीन आरोपींना अटक केली आहे.

सरकारी कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी कठोर कारवाईची मागणी नागरिकांतून होत आहे.

(१३) लोकसत्ता पृ. ५

# अंगावर गोण्या पडून कामगाराचा मृत्यू

**विरार :** भाईंदर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका किराणा दुकानात मजुराच्या अंगावर धान्याने भरलेल्या गोण्या पडल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. या संदर्भात भाईंदर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

भाईंदर पश्चिम, बेकरी गल्ली येथे असलेल्या हरदेव किराणा स्टोर या दुकानात काम करणारा राहुल जिया मार्या (२५) हा दुकानातच राहत असे. रविवारी सकाळी दुसरा कामगार रोशन मिश्रा हा दुकान उघडण्यासाठी गेला असता त्याने राहुलला बाहेरून आवाज दिला. मात्र कोणताही प्रतिसाद न आल्याने त्याने त्याच्याकडील चावीने दुकान उघडून आत गेला असता, राहुल हा मूर्च्छित अवस्थेत पडला होता, त्याच्या अंगावर तांदळाने भरलेली गोणी, मिठाची गोणी आणि पिण्याच्या पाण्याच्या बाटलीचा बॉक्स पडला होता. त्याने राहूलला हलवून उठवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने कोणतीही हालचाल केली नाही. यामुळे पोलिसांना बोलावण्यात आले. पोलिसांनी राहुलला रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी त्याला मयत घोषित केले.

दि.०८/११/२२.

(२४) लोकसत्ता पृ. ५/१ नं.०१

# वीजदेयक अद्ययावत करण्याच्या बहाण्याने २५ हजार रुपयांची फसवणूक

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** वीजदेयक अद्ययावत करण्याच्या नावाखाली वसईत एका वीजग्राहकाला २५ हजारांचा गंडा घातलेली रक्कम मिळविण्यात सायबर गुन्हे कक्षास यश आले आहे.

वसई विरार शहरात ऑनलाइन वीजदेयक भरणा, वीजदेयक अद्ययावत करणे अशा विविध प्रकारे फसवणूक होण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. नुकताच तुळिंज पोलीस व विरार पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या दोन वीज ग्राहकांना त्यांच्या मोबाइलवर अनोळखी व्यक्तीने फोन करून तुमचे वीजदेयक भरले नाही त्यामुळे वीजपुरवठा खंडित केला जाईल, असे सांगून मोबाइलवर आलेला ओटीपी मिळवून सुमारे २५ हजारांचा गंडा घातला होता. याची तक्रार सायबर गुन्हे कक्षाकडे करण्यात आली होती.

त्यानंतर पोलिसांनी व्यवहाराची माहिती प्राप्त करून मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांची फसवणूक रक्कम पेयु, पेटीएम, मोचिविचक, प्रिचार्ज या कंपनीचे पेमेंट वॉलेटवर गेल्याचे दिसून आल्याने संबंधित कंपनीसोबत पत्रव्यवहार व पाठपुरावा करून ही रक्कम परत मिळविली आहे. कारवाई पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, पोलीस उपनिरीक्षक प्रसाद शेनोळकर व त्यांच्या पथकाने केली आहे. ऑनलाइन होणाऱ्या फसवणुकीपासून नागरिकांनी सावध व सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

(२५) लोकसत्ता पृ.५/१ नं.०१

# हलवायाविरोधातील तक्रारीमुळे ग्राहकास दोन लाखांचा गंडा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** बनावट मिठाईप्रकरणी हलवाईविरोधात ऑनलाइन तक्रार करताना चुकीची लिंक उघडल्याने एकाला दोन लाखाचा भुर्दंड सोसावा लागला.

नालासोपारा पूर्वेकडील संतोष भुवन परिसरात राहणाऱ्या चंद्रशेखर विठ्ठल तारी (४२) यांनी एका दुकानातून मिठाई विकत घेतली होती. परंतु ती खराब असल्याने दुकानदाराविरोधात पालिकेच्या संकेतस्थळावर तारी यांनी मिठाईवाल्याची तक्रार करताना चुकीची लिंक उघडली, या लिंकव्दारे त्यांना तक्रार नोंदविण्यासाठी पाच रुपये भरायला सांगितले.

तारी यांनी प्रक्रिया पूर्ण केली. मात्र त्यांना काही वेळात एक फोन आला आणि तुमचे पाच रुपये जमा न झाल्याने तुमची तक्रार ग्राह्य धरली जाणार नसल्याचे त्यांना सांगण्यात आले आणि पैसे भरण्यासाठी त्यांच्या मोबाइलवर काही लिंक पाठवण्यात आल्या. त्यांच्या खात्यातून १ लाख ८५ हजार रुपये वटवण्यात आले.

फसवणूक झाल्याचे तारी यांच्या लक्षात येताच त्यांनी तुळींज पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. सायबर पोलिसांच्या मदतीने आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.

दि.०८/११/२२.

(७५) पुढारी पान नं.०१

# हर हर महादेव : ठाण्यात मनसे विरुद्ध राष्ट्रवादी

## आव्हाडांनी बंद पाडलेला चित्रपटाचा शो मनसेने सुरू केला

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

प्रसिद्ध अभिनेता सुबोध भावे याच्या 'हर हर महादेव' या चित्रपटावरून ठाण्यात सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र नवनिर्माण सेना असा संघर्ष उभा ठाकला आणि विवियाना मॉलमधील चित्रपटगृहात एकच रणकंदन झाले. माजी मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्यासोबतच्या कार्यकर्त्यांनी प्रेक्षकांना मारझोड केल्याने तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत.



**ठाणे : आधी बेदम चोप दिल्यानंतर सहकुटुंब आलेल्या प्रेक्षकाला तिकिटाचे पैसे देण्याचा प्रयत्न करताना माजी मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड.** (छाया : अनिषा शिंदे)

सिनेमांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज, सेनापती, मावळ्यांचे आणि इतिहासाचे विकृती करून दाखवणे बंद करा अन्यथा चित्रपट बंद पाडू असा इशारा छत्रपती संभाजी महाराजांनी रविवारी दिला होता. दुसऱ्याच दिवशी सोमवारी त्याचे राज्यभरात तीव्र पडसाद उमटले.

/...२

पान नं.०२.

## हर हर महादेव : मनसेविरुद्ध राष्ट्रवादी

सोलापुरातही सकल मराठा समाजाने सोमवारी येथील चित्रपटागृहांमध्ये सुरू असलेल्या या चित्रपटाचे खेळ बंद पाडले. माजी मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड रात्री ठाण्यातील विवियाना चित्रपटगृहात कार्यकर्त्यांसह घुसले व सुरू असलेला हर हर महादेव चित्रपट बंद पाडला. यावेळी आव्हाड यांच्यासमवेत शहर अध्यक्ष आनंद परांजपे, मिलिंद पाटील आदी कार्यकर्ते होते. आव्हाड आम्हाला कोण सांगणार आणि तिकिटाचे पैसे परत करा असा सवाल करणाऱ्या प्रेक्षकाला आव्हाड यांच्या काही कार्यकर्त्यांनी बेदम मारहाण केली.

सुबोध भावे, शरद केळकर यांची प्रमुख भूमिका असलेल्या हर हर महादेव चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाची खोटी माहिती, त्याचे विकृतीकरण करण्यात आल्याचा आरोप करीत आव्हाड यांनी यावेळी केला. चित्रपट पाहू नका अशी विनंती त्यांनी केली आणि प्रेक्षकांना बाहेर जाण्यास सांगितले. सर्वच प्रेक्षकांनी मग काढता पाय घेतला. मात्र एक प्रेक्षक कुटुंबासह चित्रपट पाहत होता. त्यांनी चित्रपट बंद करण्यास विरोध केला. माझे पैसे परत करा अशी मागणी व्यवस्थानाकडे केली. आम्ही चित्रपट का पाहू नये, चित्रपट बंद का करायचा असे सवालही त्याने केले. आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांनी आधी त्याची समजूत काढली आणि मग वाद विकोपाला गेल्याने संतप्त कार्यकर्त्यांनी त्या प्रेक्षकाला कोपऱ्यात नेवून झोडले.

**मनसेची उडी**

हा प्रकार समजताच मनसेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष अविनाश जाधव यांनी देखील मॉल मध्ये धाव घेतली. प्रेक्षकांना मारहाण करण्याचा अधिकार यांना दिला कुणी? असा सवाल करीत जाधव यांनी चित्रपटगृहात ठाण मांडले आणि 'हर हर महादेव' चित्रपट पुन्हा सुरू करण्यास व्यवस्थापनास भाग पाडले.

दि.०८/११/२२

(१४) पुढारी पृ.पान नं.०२

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात ९९६ पदभरती

**मिरारोड :** राज्यातील सर्व जिल्हा पोलीस दल व आयुक्तालयामध्ये पोलीस शिपाई पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये देखील ९९६ पोलीस शिपाई पदांसाठी पोलीस भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या पोलीस भरतीमध्ये ९८६ पोलीस शिपाई व १० चालक पोलीस शिपाई अशी पोलीस शिपाई भरती करण्यात येणार आहे. या भरती प्रक्रियेतील आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे ९ नोव्हेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत स्विकारण्यात येणार आहेत. याबाबतीत सविस्तर माहिती संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये मंजूर मनुष्यबळापेक्षा एक हजार पोलीस अंमलदारांची पदे रिक्त असल्याने मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची कमतरता जाणवत होती. या नवीन पोलीस भरतीमुळे आयुक्तालयातील पोलीस दलामध्ये ९९६ पोलीस अंमलदारांची भर पडून जनतेच्या सेवेमध्ये नवीन पोलीस अंमलदार सेवेसाठी दाखल होणार आहेत. ही भरती पारदर्शकपणे पार पडण्यासाठी सर्व स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस आयुक्तालयाने दिली आहे.

(१५) सकाळ पृ.पान नं.०७

## पोलिस शिपाई पदासाठी भरती

**नालासोपारा (बातमीदार) :** मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालय हद्दीतील तरुणांना पोलिस भरतीची सुवर्ण संधी निर्माण झाली आहे. आयुक्तालय स्थापनेनंतर पहिल्यांदाच ९९६ पोलिस शिपाई पदाकरिता भरती होणार आहे.

याबाबत पोलिस आयुक्तालयाकडून अधिकृत माहिती देण्यात आली आहे. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयामध्ये होणाऱ्या ९९६ पोलिस शिपायांकरिता होणाऱ्या भरतीमध्ये ९८६ पोलिस शिपाई, तर १० चालक पोलिस शिपायांसाठी ही भरती होणार आहे. या भरती प्रक्रियेतील आवेदन पत्र संगणकीय प्रणालीद्वारे ९ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत स्वीकारण्यात येणार आहेत. हे आवेदन पत्र भरण्यासाठी आणि या भरती प्रक्रियेची माहिती policerecruitment२०२२.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर आहे.

दि. ०८/११/२०२२

१९) सकाळ पृ. ५/१ कं.०१

# वसईमध्ये शनिवारी मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन

विरार, ता. ७ (बातमीदार) : पालघर जिल्हा आणि मिरा-भाईंदर या पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर ख्रिस्ती समाज राहत असून हा समाज पूर्णपणे मराठी आहे. वसई मराठी ख्रिस्ती साहित्य मंडळातर्फे मराठी ख्रिस्ती समाजीय १३ वे साहित्य संमेलन शनिवारी (ता. १२) देवतलाव येथे आयोजित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ यांचे संमेलनाला अनुदान मिळाले असून, बेसिन कॅथॉलिक बँकेने हे संमेलन पुरस्कृत केले आहे. या संमेलनात अनेक साहित्यिक सहभागी होणार असल्याचे वसई मराठी ख्रिस्ती साहित्य मंडळाचे अध्यक्ष रेमंड मच्याडो यांनी सांगितले. संमेलनाचे उद्घाटन अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष साहित्यिक आणि ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जीवनदर्शन केंद्राचे माजी संचालक आणि साहित्यिक फादर हिलरी फर्नांडिस, माजी आमदार डॉमनिक घोन्साल्विस, फ्रँकलिन डायस, डॉ. सिसिलिया कार्व्हालो आणि फादर मायकलजी उपस्थित राहणार आहेत.

पहिल्या सत्रात डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यावर परिसंवाद होणार आहे. या परिसंवादात मनोज आचार्य, मॅक्सवेल लोपीस, एल. बी. पाटील आणि छगन नाईक सहभागी होणार आहेत. दुसऱ्या सत्रात प्रसाद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन होणार आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळातर्फे प्रसाद कुलकर्णी, योगेंद्र ठाकूर, एल. बी. पाटील, अरुण शेवते आणि प्रेमानंद गज्वी उपस्थित राहणार आहेत.

२०) लोकमत पृ. ५/१ कं.०२

# घरफोडी करणाऱ्यास अटक, दागिने जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** पूर्वेतील १५ नंबर बस स्टॉप परिसरातील विंगस्टोन बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या तरन्नुम खान यांच्या घरी घरफोडी केल्याप्रकरणी त्यांचा भाऊ फरमान जावेद खान यास पोलिसांनी गुजरातमधील बलसाड येथून अटक केली आहे. त्याच्याकडून २५ लाख २४ हजार रुपये रक्कम व गुन्ह्यात वापरलेले सहा मोबाइल फोन व दागिने, असा मुद्देमाल जप्त केला आहे.

तरन्नुम खान यांच्या घराचे लॉक तोडून कपाटातील २५ लाख रुपये व सोन्याची चेने, १० ग्रॅमचे कानातील झुमके, असा एकूण २६ लाख ६० हजारांचा ऐवज चोरट्याने चोरून नेला होता. त्याची तक्रार त्यांनी मीरा रोड पोलीस दिली होती. गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीराच्या पोलिसांना ही चोरी तरन्नुम यांचा भाऊ फरमान याने केल्याचा संशय आला. त्यानंतर त्याला बलसाड येथून अटक केली.